**ठळक बातम्या**

- स्पर्धा परीक्षांमधे पेपर फुटणं आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात विधेयक मांडण्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

- विधानपरिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाकडून पंकजा मुंडे, योगेश टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत, तर काँग्रेसकडून प्रज्ञा सातव यांना उमेदवारी जाहीर

- तीन नवे फौजदारी कायदे आजपासून देशभरात लागू

- महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात भारताचा दहा गडी राखून विजय

**आणि**

- मानहानीच्या खटल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना पाच महिन्यांच्या कारावासाची शिक्षा

**<><><><><>**

स्पर्धा परीक्षांमधे पेपर फुटणं आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कायदा करण्यात येत असून विधिमंडळाच्या चालू अधिवेशनातच त्याचं विधेयक मांडण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. याबाबत नंतर बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितल…

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस (१८ सेकंद)**

'गट क' श्रेणीतल्या पदाची भरती MPSC मार्फत होणार आहे. महायुती सरकारच्या काळात १ लाख पदांची भरती होत असून त्यातल्या ५६ हजाराहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्र दिली आहेत. सुमारे २० हजार नियुक्ती पत्र लवकरच दिली जातील, असं ते म्हणाले. आणखी ३१ हजारांहून अधिक पदांची भरती प्रक्रीया सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपायांची माहिती त्यांनी दिली.

नवे फौजदारी कायदे आजपासून लागू झाले असून, त्या अंतर्गत सकाळी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी पोलीस स्टेशनला पहिला गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती फडनवीस यांनी दिली.

भुसावळ-दीपनगर इथल्या ६६० मेगावॅट औष्णिक वीजप्रकल्प जून २०२२ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करायचा होता पण कोरोनामुळे कालावधी वाढवण्यात आला होता. या प्रकल्पातून ऑगस्टपासून वीज तयार होईल आणि सप्टेंबरपासून ती व्यापारी तत्त्वार उपलब्धही होईल, असं फडनवीस यांनी सांगितलं.

राज्यातल्या निमशासकीय आणि अनुदानित संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्ती वेतन योजनेचा पर्याय देण्याचा निर्णय पुढच्या तीन महिन्यांच्या आत घेतला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी निघालेल्या जाहिरातीनुसार त्यानंतरच्या कालावधीत सेवेत

रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ घेता येईल. यासंदर्भात संजय केळकर, बाळासाहेब थोरात, आशिष शेलार यांनी प्रश्न-उपप्रश्न विचारले होते.

मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व जाहिरात फलकांचं स्ट्रक्चरल ऑडिट येत्या महिनाभरात केलं जाईल, असं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितलं.

मुंबईतल्या झोपडपट्ट्यांच्या तिसऱ्या - चौथ्या मजल्याच सर्वेक्षण करण्यासाठी वरिष्ठ आयएएस अधिका-यांची नियुक्ती केली जाईल. त्यांचा चौकशी अहवाल पुढच्या अधिवेशनात सादर केला जाईल, असं आश्वासन सामंत यांनी दुसऱ्या एका लक्षवेधीवरच्या चर्चेत दिलं.

नागपूरमधल्या दीक्षाभूमी स्तूपाजवळच्या भूमिगत पार्किंगविरोधात आज आंबेडकरी संघटनांनी आंदोलन केल्यानंतर या बांधकामाला तत्काळ स्थिगिती देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत केली. दीक्षाभूमीच्या मुख्य स्तूपाला या पार्किंगमुळे धोका निर्माण होईल, असा आंदोलकांचा आक्षेप आहे. आराखड्याबद्दलचे आक्षेप लक्षात घेऊन सुधारणा केली जाईल असं फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत दंतवैद्यकीय उपचारही समाविष्ट करण्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आज विधान परिषदेत केली. या योजनेशी संबंधित अडचणींबाबत आमदार सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते.

आंतरराष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर पुरस्कार पटकावणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत मंत्रिमंडळाने एक सर्वसमावेशक धोरण ठरवलं असून चालू अधिवेशनात त्याबाबतचा शासन निर्णय आणला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. आमदार प्रवीण दटके यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

मुंबई ते मोरा फेरी बोटीवरच्या कामगारांना, आर्थिक मदत किंवा कर सवलतीची कोणतीही मागणी आलेली नसल्याची माहिती संबंधित खात्याचे मंत्री संजय बनसोडे यांच्या वतीने उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. यावर विरोधी पक्षांनी पुन्हा गदारोळ आणि घोषणाबाजी करून सभात्याग केला. या प्रश्नाबाबत सहानुभूतीने विचार करून बैठक घेऊ, असं आश्वासन पाटील यांनी दिलं. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयक विधानपरिषदेत मंजुर झालं.

राहुल गांधी यांनी आज लोकसभेत केलेल्या वक्तव्याची दखल घेऊन उपसभापतींनी निषेध ठराव आणावा, अन्यथा सभागृहाचं कामकाज चालू देणार नाही, अशी भूमिका विधान परिषदेत भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी घेतली. यावरून सत्ताधारी पक्षानं घोषणाबाजी आणि गदारोळ केला. गदारोळ सुरूच राहिल्यानं उपसभापतींनी सभागृहाचं कामकाज आधी दोन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानपरिषदेच्या आगामी द्विवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाने पाच उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. यात पंकजा मुंडे, योगेश

टिळेकर, परिणय फुके, अमित गोरखे आणि सदाभाऊ खोत यांचा समावेश आहे. या उमेदवारांच्या नावावर भाजपाच्या केंद्रिय निवडणूक समितीने शिक्कामोर्तब केलं आहे. तर काँग्रेसकडून प्रज्ञा सातव यांना उमेदवारी देण्याचं काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम हे तीन नवे फौजदारी कायदे आजपासून देशभरात लागू झाले.

या फौजदारी कायद्यांचा उद्देश शिक्षा देणं नसून न्याय देणं आहे, असं सरकारनं म्हटलं आहे. त्यामुळे विधायक परिणाम साधण्याच्या उद्देशाने अनेक वेगवेगळ्या उपायांची तरतूद या फौजदारी कायद्यांमधे केली आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात भारतानं आज दहा गडी राखून विजय मिळवला. आज चौथ्या दिवशी आपल्या दुसऱ्या डावात आफ्रिकेनं सर्वबाद ३७३ धावा करून ३६ धावांची आघाडी घेतली होती. भारतानं हे आव्हान एकही गडी न गमावता पूर्ण केलं.

भारतानं पहिल्या डावात ६०३ धावांची सर्वोच्च धावसंख्या उभारत डाव घोषित केला होता. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ २६६ धावात आटोपला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेवर फॉलोऑनची नामुष्की ओढावली. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेने लॉरा वोलवार्द्त हिच्या

१२२ आणि सुने लुस हिच्या १०९ धावांच्या जोरावर ३७३ धावांचा टप्पा गाठला आणि ३६ धावांची आघाडी घेतली. भारताच्या शफाली शहानं २४ आणि सतीश शुभा हिनं १३ धावा करत ही आघाडी लीलया पार करत विजय साकार केला.

<><><><><>

वीस वर्षांपूर्वी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीतल्या न्यायालयानं पाच महिन्यांचा कारावास ठोठावला आहे. दिल्लीचे सध्याचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी हा खटला दाखल केला होता. मेधा पाटकर यांनी आपल्याबद्दल प्रसिद्धीपत्रकाद्वारे अपमानजनक मजकूर प्रसिद्ध केल्याचा आरोप करत सक्सेना यांनी २००१ साली गुजरातमधल्या अहमदाबाद न्यायालयात याचिका दाखल केली होती. हा खटला २००२ मध्ये दिल्ली न्यायालयात वर्ग करण्यात आला होता. याप्रकरणी २५ मे रोजी नवी दिल्लीतल्या दक्षिण जिल्हा न्यायालयानं पाटकर यांना दोषी ठरवलं होतं.

<><><><><>

विधान परिषदेच्या ४ मतदारसंघातल्या निवडणुकीची मतमोजणी आज सकाळी सुरु झाली. कोकण पदवीधर, मुंबई पदवीधर आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ या तीन मतदार संघांची मतमोजणी नवीमुंबईत नेरुळ इथं होत असून,  अद्याप कोणताही आकडेवारी अधिकृतरित्या हाती आलेली नाही.

नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणीही आज होत आहे. रात्री नऊच्या सुमाराला प्रथम पसंतीची मतं घोषीत केली जातील, असं सहायक निवडणूक अधिकारी नीलेश सगर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंती दिनानिमित्त आज राज्यात कृषी दिन साजरा करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार,तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केलं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला, कोकण आणि मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे, या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**